RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक ३] शुक्रवार, एप्रिल १२, २०१३/चैत्र २२, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.**—महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे १-२ |

दिनांक ११ एप्रिल २०१३ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १२ एप्रिल २०१३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२००५ चा महा. ९.

२०१३ चा महा. अध्या. ५.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २ मार्च २०१३ रोजी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश, २०१३ प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौसष्ठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अधिनियम, २०१३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक २ मार्च २०१३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २३ मध्ये,— २००५ चा महा. ९.

(क) पोट-कलम (२) मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु तसेच, १ एप्रिल २००८ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या आणि ३१ मार्च २००९ रोजी किंवा त्यापूर्वी संपणाऱ्या कालावधीच्या संबंधात, या पोट-कलमाखाली निर्धारणाचा कोणताही आदेश, ३० जून २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी काढता येईल." ;

(ख) पोट-कलम (३क) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, १ एप्रिल २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या आणि ३१ मार्च २००६ रोजी किंवा त्यापूर्वी संपणाऱ्या कालावधीच्या संबंधात, संबंधित तरतुदींखाली निर्धारणाचा कोणताही आदेश, ३० जून २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी काढता येईल.".

सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश, २०१३, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१३ चा महा. अध्या. ५.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक ११] शुक्रवार, एप्रिल १२, २०१३/चैत्र २२, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये १८.००

### असाधारण क्रमांक २०

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Value Added Tax (Amendment) Act, 2013 (Mah. Act No. IV of 2013), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. IV OF 2013.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 12th April 2013.)*

An Act further to amend the Maharashtra Value Added Tax Act, 2002.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Value Added Tax Act, 2002, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra Value Added Tax (Amendment) Ordinance, 2013, on the 2nd March 2013 ;

Mah. IX of 2005. Mah. Ord. V of 2013.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-fourth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** *(1)* This Act may be called the Maharashtra Value Added Tax (Amendment) Act, 2013.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 2nd March 2013.

Amendment of section 23 of Mah. IX of 2005.

**2.** In section 23 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (hereinafter referred to as " the principal Act "),— Mah. IX of 2005.

(*a*) in sub-section (*2*), after the second proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, in respect of the period commencing on or after the 1st April 2008 and ending on or before the 31st March 2009, an order of assessment under this sub-section may be made on or before the 30th June 2013." ;

(*b*) in sub-section (*3A*), the following proviso shall be added, namely :—

" Provided that, in respect of the period commencing on or after the 1st April 2005 and ending on or before the 31st March 2006, an order of assessment under the respective provisions may be made on or before the 30th June 2013.".

Repeal of Mah. Ord. V of 2013 and saving.

**3.** (*1*) The Maharashtra Value Added Tax (Amendment) Ordinance, 2013, is hereby repealed. Mah. Ord. V of 2013.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provisions of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or, as the case may be, issued under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.